आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१० ऑगस्ट २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- केरळमधल्या वायनाड दुर्घटनेतल्या बचावकार्यात आतापर्यंत ३० जणांना वाचवण्यात यश, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून आपतग्रस्त भागाचं हवाई सर्वेक्षण
- रेल्वेच्या २४ हजार कोटी रुपयांच्या आठ प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी/ महाराष्ट्रातल्या जालना - जळगाव रेल्वेमार्गाचाही समावेश
- बँकिंग क्षेत्रात बहुप्रतिक्षित सुधारणा सरकार राबवत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन
- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कुस्तीपटू अमन सेहरावतची कांस्यपदकाला गवसणी **आणि**
- ज्येष्ठ मराठी अभिनेते विजय कदम यांचं दीर्घ आजारानं निधन

**<><><><><>**

वायनाड इथं ३० जुलै रोजी दरड कोसळून झालेल्या दुर्घटनाग्रस्त प्रदेशाला भेट देण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज केरळ दौऱ्यावर गेले आहेत. कन्नुर विमानतळावर आज सकाळी राज्यपाल आरीफ मोहम्मद खान, मुख्यमंत्री पिनरायी विजयन यांची प्रधानमंत्र्यांचं स्वागत केलं. या दौऱ्यात प्रधानमंत्र्यांनी आपतग्रस्त प्रदेशाचं हवाई सर्वेक्षण केलं. तसंच बचाव आणि मदतकार्याची माहिती घेतली. केरळचे मुख्यमंत्री पिनरायी विजयन यावेळी प्रधानमंत्र्यांसोबत होते. प्रधानमंत्री मदत शिबिरं तसंच रुग्णालयांनाही भेट देतील. दुर्घटनेत जखमी झालेल्यांशी आणि मृतांच्या कुटुंबीयांशी ते संवाद साधणार आहेत. दरम्यान, या दुर्घटनेला राष्ट्रीय आपत्ती घोषित करावं अशी मागणी राज्य सरकार आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखालच्या विरोधी पक्षांनी केली आहे.

दरम्यान, वायनाडमध्ये केंद्र सरकारने राबवलेल्या बचाव कार्यात आतापर्यंत ३० जणांना वाचवण्यात यश आलं आहे, तर ५२० जणांना सुरक्षित स्थळी हवलण्यात आलं. घटनास्थळावरून ११२ मृतदेह ताब्यात घेण्यात आले आहेत.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहार-विषयक केंद्रीय मंत्रिमंडळ समितीनं रेल्वे मंत्रालयाच्या २४ हजार६५७ कोटी रुपयांच्या आठ प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल वार्ताहरांशी बोलताना ही माहिती दिली. महाराष्ट्रासह ओदिशा, आंध्र प्रदेश, झारखंड, बिहार, तेलंगणा आणि पश्चिम बंगाल या सात राज्यांमधल्या १४ जिल्ह्यांमध्ये हे प्रकल्प राबवण्यात येणार असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

या प्रकल्पांमध्ये महाराष्ट्रातल्या जालना - जळगाव ब्रॉडगेज रेल्वेमार्गाचाही समावेश आहे. या मार्गामुळे युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळात समावेश असणाऱ्या अजिंठा लेण्यांकडे जाणं सोयीचं होणार आहे. तसंच विदर्भ आणि मराठवाडा भागासाठीही हा मार्ग फायदेशीर ठरणार असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

<><><><><>

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत शहरी भागासाठीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या योजनेला तसंच ग्रामीण भागात २०२४-२५ ते २०२८-२९ या आर्थिक वर्षातल्या अंमलबजावणीला केंद्रीय मंत्रिमंडळानं मान्यता दिली आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलताना ही माहिती दिली.

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तीन कोटी नवी घरं  बांधण्यात येणार असून, त्यापैकी दोन कोटी घरं ग्रामीण भागात, तर एक कोटी घरं शहरी भागात बांधली जाणार आहेत. या योजनेसाठी तीन लाख साठ हजार कोटी रुपयांची तरतूद

करण्यात येणार आहे, असंही त्यांनी सांगितलं. कृषी मंत्रालयाच्या स्वच्छ वनस्पती योजनेलाही सरकारनं मंजुरी दिली असून, यासाठी एक हजार ७६५ कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक करण्यात येणार आहे. ही योजना देशातल्या फलोत्पादन क्षेत्रात क्रांती घडवून आणेल आणि उत्कृष्टता आणि टिकाऊपणासाठी नवी मानकं स्थापित करेल अशी आशा सरकारने व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

भारत आणि तिमोर लेस्ते हे दोन्ही देश मैत्री आणि लोकशाहीविषयी वचनबद्ध असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. तिमोर लेस्तेची राजधानी डिली इथं आयोजित कार्यक्रमात त्या संबोधित करत होत्या. तिमोर लेस्तेच्या सर्वोच्च नेत्यांशी आज राष्ट्रपतींनी द्विपक्षीय चर्चा केली असून भारतीय समुदायाशीही संवाद साधला.

**<><><><><>**

भारताची मालदीवसोबत भागीदारी ही परस्परांचं कल्याण आणि हितासाठी एकत्रित काम करण्याच्या उत्कट इच्छेवर आधारित असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. ते आज आपल्या तीन दिवसीय मालदीव दौऱ्यादरम्यान बोलत होते.

**<><><><><>**

लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी आज १८ व्या लोकसभेच्या नवनियुक्त खासदारांसाठी ओळख आणि मार्गदर्शन कार्यक्रमाची सुरुवात केली. सर्व नव्या खासदारांना सभागृहाच्या कामकाज आणि सुविधांबाबत शिफारशी सुचवण्याचं आवाहनही बिर्ला यांनी केलं. नव्या सदस्यांचे नवविचार आणि पुन्हा निवडून

आलेल्या सदस्यांचा व्यापक अनुभव संसदीय कामकाजाची गुणवत्ता वाढवेल, असा विश्वासही बिर्ला यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

घरोघरी तिरंगा या अभियानात राज्यातले सर्व स्तरातले नागरिक सहभागी होत आहेत. अनेकांनी आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावला असून समाज माध्यमावरही तिरंग्याचं चित्र लावलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीसह विविध क्षेत्रातले मान्यवर यात सहभागी झाले आहेत.

घरोघरी तिरंगा अभियानाविषयी अभिनेता समीर चौघुले यांनी आकाशवाणीला सांगितलं…

**होल्ड -- बाईट - (समीर चौघुले)**

**<><><><><>**

सरकार आणत असलेल्या बँकिंग नियमन सुधारणांची दीर्घ कालपासून गरज होती, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज रिझर्व्ह बँकेच्या मध्यवर्ती संचालक मंडळाशी संवाद साधताना बोलत होत्या. यावेळी प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी तसेच उपस्थित उद्योजकांनी अर्थव्यवस्थेबाबत प्रश्न विचारले. भारताच्या परकीय चलनसाठ्यानं ऐतिहासिक उंची गाठली असल्याची माहिती दास यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

भारतीय शेअर बाजारांमधे गेल्या जुलै महिन्यात परकीय गुंतवणूकदारांनी ४० लाख डॉलर्सपेक्षा जास्त गुंतवणूक केली आहे. गेल्या डिसेंबरनंतर ही सर्वात मोठी

परदेशी गुंतवणूक असून त्यामुळे राष्ट्रीय शेअर बाजारात सुमारे १५ टक्के वार्षिक वाढ नोंदली गेली.

**<><><><><>**

भारताच्या संरक्षण निर्यातीत २०२४-२५ च्या पहिल्या तिमाहीत गेल्या आर्थिक वर्षातल्या याच कालावधीच्या तुलनेत ७८ टक्क्यांनी वाढ झाली आहे. देशाची संरक्षण निर्यात ६ हजार ९१५ कोटी रुपये झाली. मागील वर्षी ही निर्यात ३ हजार ८६५ कोटी रुपये इतकी होती. संरक्षण दलाचे प्रवक्ते ए. भारत भूषण बाबू यांनी समाजमाध्यमांवर ही माहिती दिली.

**<><><><><>**

बांगलादेशात सुरू असलेल्या राजकीय अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर नागालँडमध्ये अवैध स्थलांतरितांची घुसखोरी रोखण्यासाठी नागालँड सरकार दक्ष झालं आहे. राज्यातल्या सर्व उपायुक्तांना आपापल्या जिल्ह्यात सुरक्षेच्या दृष्टीने सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्याचं गृह आयुक्त व्यासन आर यांनी काल सांगितलं.

**<><><><><>**

व्हेनेझुएला मधे एक्स समाजमाध्यमावर १० दिवस बंदी घालण्यात आली आहे. गेल्या २८ जुलैला व्हेनेझुएलामधे झालेल्या अध्यक्षीय निवडणुकीत द्वेषभावना पसरवल्याचा आरोप तिथले अध्यक्ष मादुरो यांनी एक्स चे मालक एलॉन मस्क यांच्यावर केला आहे. आपल्या विरोधकांनी राजकीय अराजक माजवण्यासाठी एक्स माध्यमाचा वापर केल्याचा आरोपही मादुरो यांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर पुढचे १० दिवस व्हेनेझुएलात एक्स वर बंद राहील.

**<><><><><>**

जंगलचा राजा सिंहाच्या संरक्षण संवर्धनाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने आज जागतिक सिंह दिवस साजरा केला जात आहे. सिंहांची घटती संख्या आणि त्यांचं विविध धोक्यांपासून संरक्षण करण्याची तातडीची गरज- याकडे जगाचं लक्ष वेधणे; हा या दिवसाचा उद्देश आहे. गीरच्या जंगलात आढळणार्या आशियाई सिंहाची संख्या २०१५ मधे ५२३ होती, ती २०२० पर्यंत ६७४ झाली असल्याचं पर्यावरण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताचा कुस्तीपटू अमन सेहरावत यानं काल पुरुषांच्या ५७ किलो वजनी गटात फ्रीस्टाइल स्पर्धेत कांस्यपदकाला गवसणी घातली. त्यानं प्युर्टो रिकोच्या डेरियन क्रूजला १३-५ असं हरवलं. पॅरिस ऑलिम्पिकमधलं हे भारताचं सहावं आणि कुस्तीतलं पहिलं पदक आहे. २१ वर्षं आणि २४ दिवस वय असलेला अमन ऑलिम्पिक पदक पटकावणारा सर्वात कमी वयाचा भारतीय ठरला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी या यशाबद्दल अमन सेहरावत याचं अभिनंदन केलं आहे. दरम्यान, पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज भारताची पैलवान रीतिका हूडा ७६ किलो वजनी गटात मैदानात उतरणार आहे. गोल्फमध्ये कालच्या तिसऱ्या फेरीत अदिती अशोक आणि दीक्षा डागर या दोघींचीही कामगिरी निराशाजनक होती. त्यांची पुढची फेरी आज होणार आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ मराठी अभिनेते विजय कदम यांचं आज दीर्घ आजारानं निधन झालं. ते ६७ वर्षांचे होते. काही काळापूर्वी त्यांना कर्करोगाचं निदान झालं होतं. आज दुपारी त्यांच्या पार्थिवावर मुंबईतल्या ओशिवरा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत.

मराठी नाटक, चित्रपट आणि मालिकांमध्ये त्यांनी विविध भूमिका केल्या. १९८० आणि ९०च्या दशकात त्यांनी रंगभूमीवर केलेल्या विनोदी भूमिका प्रचंड गाजल्या. प्रायोगिक रंगभूमीवरुन कारकिर्दीची सुरुवात करणाऱ्या कदम यांनी टुरटूर या नाटकाद्वारे व्यावसायिक रंगमंचावर पदार्पण केलं. त्यानंतर विच्छा माझी पुरी करा, हे त्यांचं वगनाट्यही रसिकांनी उचलून धरलं. हलकंफुलकं हे देखील त्यांचं लोकप्रिय नाटक. प्रभावी आवाज, संवादफेक आणि भूमिकेत शिरुन सादर करण्याची त्यांची क्षमता ही त्यांच्या अभिनयाची वैशिष्ट्यं. रथ चक्र या नाटकातून तसंच मोठ्या आणि छोट्या रुपेरी पडद्यावरही त्यांनी अनेक अनेक भूमिकांमधून सकस अभिनयाचं प्रत्यंतर दिलं. नाट्यदर्पणचा सर्वोत्कृष्ट लोकनाट्य कलाकाराचा पुरस्कार त्यांना मिळाला होता.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी विजय कदम यांना समाज माध्यमावरच्या संदेशातून आदरांजली वाहिली आहे. एक अष्टपैलू अभिनेता हरपल्याचं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.